# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०३/२०२५ (बुधवार) संध्याकाळ**

---

## चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास केले जेरबंद बुटीबोरी पोलीसांची कारवाई एकूण ५०,००० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन बोरी** :— फिर्यादी नामे सुरेश बाबूलाल विस्नोई, वय २७ वर्षे, करनाभुंका ग्राम ,पो.स्ट सिंदरी ,तह. जालोर ,जिल्हा जोतपूर, ह.मू. वार्ड नं ३ बस स्टॅड, जवळ ,बुटीबोरी, ता. जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की , दिनांक ०४/०३/२०२५ चे सकाळी १०:०० ते १०:३० वा दरम्यान चौधरी हॉस्पीटल बुटीबोरी समोर त्यांच्या चहा च्या ठेल्याच्या शेजारी लावलेली जुनी वापरती इंडिका गाडी कार क्रमांक एम.एच.२७ ए.सी २७७१ किंमती ५०,०००/— रूपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेली. असा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे अप.क. २८७/२०२५ कलम ३०३(२) भा. न्या.स अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हा उघडकीस आणणेकामी श्री दिपक अग्रवाल ,सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर, विभाग नागपुर यांच्या मौखिक आदेशाने श्री प्रतापराव भोसले, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बुटटीबोरी यांनी बुटीबोरी गुन्हे प्रगटीकरण शाखेचे अधिकारी आणि अंमलदारांचे पथक तयार केले. सदर पथकाने गुन्हा उघडकीस आणणे करीता घटनास्थळ व पोलीस परिसरातील गुप्तबातमीदारांच्या मार्फतीने माहीती मिळवली असता दिनांक ११/०३/२०२५ रोजी पोलीसांना सराईत गुन्हेगार संकेत झोडापे, रा. म्हाडा कॉलनी, बुटीबोरी याने सदर गुन्हा केल्याची माहीती प्राप्त झाली. सदर आरोपीचा शोध घेत असताना आरोपी हा मौजा रूईखैरी येथे असल्याची माहिती मिळाल्या वरून रूईखैरी येथे जावुन पोलीसांनी शिताफिने आरोपीस पिकडून त्यास ताब्यात घेतले असता त्याने आपले नाव गाव **संकेत देवराव झोडापे, रा चनोडा, ता. उमरेड ह.मू म्हाडा कॉलनी, बुटीबोरी** असे सांगितले. सदर गुन्हा आरोपीने

केल्याबाबत खात्री पटल्याने पोलीसांना त्यास सखोल विचारपुस केली आणि आरोपीच्या ताब्यातुन इंडिका गाडी कार क्रमांक एम.एच.२७ ए.सी २७११ किंमती २७७१ किंमती **५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर